प्रेसनोट

जा.क्र.६२/माहिती कक्ष/वार्तापत्र
/२०१७,
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक:-२८/०१/२०१७.

## " पोलीस अधीक्षक विनीता साहु यांचेकडन सर्वसामान्य जनतेकरीता फिरते पोलीस ठाणे " या योजनेचे अनावरण

भंडारा:— दिनांक २६/०१/२०१७ रोजी भारताच्या ६८ व्या प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने भंडारा जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीमती विनीता साहु यांच्या संकल्पनेतुन भंडारा जिल्हयातील सर्वसामान्य जनते करीता" फिरते पोलीस ठाणे" ही नाविन्यपुर्ण संकंल्पना जाहीर करण्यात आली होती त्या अनुषंगाने आज दि. २८/०१/२०१७ रोजी भंडारा शहर पोलीस ठाणे अंतर्गत मेंढा परीसरातील गणेश मंदीर येथे पोलीस अधीक्षक विनीता साहु यांच्ये हस्ते सदर मोबाईल पोलीस ठाणे योजनेचे उद्‌घाटन करण्यात आले

सदर उदघाटन प्रंसगी भंडार पो.ठाणे चे ठानेदार पोलीस निरीक्षक चव्हाण, वाहतुक पोलीस निरीक्षक राऊत,जिल्हयातील पोलीस अधीकारी व कर्मचारी व परीसरातील नगर सेवक श्री उईके, श्री तांडेकर, माजी नगर सेवीका श्रीमती बोरकर व परीसरातील नागरीक मोठया संख्येने हजर होते.

सदरचे फिरते पोलीस ठाणे हे मोठया पोलीस वाहनातुन जिल्हयातील ग्रामीन भागातील, दुरक्षेत्रातील एखादे ठिकाणी पोहचेल व त्या ठिकाणी टेंन्ट /शामियाना उभारून आठवडयातील एक दिवस त्या ठिकानी ३ ते ४ तास थांबुन तेथील नागरीकांच्या तक्रारी नोंद करून घेईल व पुढे त्या संबधीत पोलीस.ठाण्याकडे वर्ग करील..सर्व सामान्य व्यक्ती ज्या पध्दतीने पो.ठाण्यास जावुन आपली तक्रार नोंदविते अगदी त्याच प्रमाणे सदर फिरत्या पोलीस ठाण्यामध्ये देखील त्यांना आपली तक्रार नोंदवीता येईल. सदर "फिरते पोलीस ठाणे "च्या कार्यक्रमाबाबत जिल्हयातील पो.ठाणे, गावातील , सरपंच या लोकसेवकांना तसेच तंटामुक्ती अध्यक्ष, स्थानीक प्रतिनीधी व सामाजीक कार्य करणा—या संस्था यांना आगावु माहीती कळविण्यात येईल व त्यांचे सहकार्य घेण्यात येईल

सदर फिरते पोलीस.ठाणे योजनेमध्ये ग्रमीन भागातील दुरक्षेत्रामध्ये राहनारी सर्व सामान्य जनता, जेष्ट नागरीक ,अपंग व्यक्ती, महीला, लहान मुले व मुली कि जे आपली तक्रार देण्याकरीता पो.ठाण्यात जावु शकत नाहीत किंवा तक्रार दाखल करण्यास घाबरतात अशा पिडीत व्यक्तींची मोठी सोय या योजनेमुळे होणार असुन स्थानिकांच्या समस्या जानुन घेणे तसेच लोकांमध्ये विविध बाबतीत जागरूकता निर्माण करने, स्थानिक लोंकाकडुन माहीती प्राप्त करने, अवैध व्यवसायांना आळा घालने यासाठी या योजनेचा फायदा मोठया प्रमानात होणार आहे या करीता सदर योजनेचे ब्रिद वाक्य " **भंडारा पोलीस आपके साथ भी... आपके पास भी** "असे ठेवण्यात आलेले आहे

(बी. आर. गाडे)
पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता